# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (कुळकायदा शाखा)

## नवीन इमारत, ए-विंग, ४ था मजला, पुणे-०१

Email ID:- tenancy११@gmail.com दुरध्वनी क्र.०२०-२६१२५१३३


क्र.आदेश/जि.स.अ./कावि/ /२०२० पुणे-०१ दि. /०३/२०२०

**विषय-** कोरोना या विषाणूच्या संसर्ग रोखण्याकरिता सहाय्यक जिल्हा समन्वयक अधिकारी म्हणून नेमणूक करणेबाबत.

**आदेश**

ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्गबाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे भारतात सर्वत्र प्रवास करित आहेत असे प्रवासी पुणे जिल्ह्यात परदेश प्रवास करुन आलेले आहेत. व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणुचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

वरील परिस्थितीचा विचार करुन दि-१४/०३/२०२० रोजी आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ ला अनुसरुन घरात विलगीकरण कक्ष करणे व त्याचे नियमन करण्यासंदर्भात आदेश पारित केलेले आहेत. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाकडील अधिसुचना दि-१४/०३/२०२० मधील परिच्छेद क्र.८ नुसार खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या निर्देशित केलेल्या क्षेत्राकरिता सुचना देणेत येत आहेत. तसेच त्यांना त्यांच्या क्षेत्रात खालीलप्रमाणे कर्तव्य व अधिकार करण्याची जबाबदारी देणेत येत आहे.

**क्षेत्रावर सर्वसाधारण सनियंत्रण-**

१) आपले क्षेत्रात कोरोनाचा प्रसार होणार नाही, यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे.

२) आपले क्षेत्रात राहणा-या व येणा-या नागरिकास संभाव्य धोका वाटत असल्यास वैद्यकीय तपासणी सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

३) आवश्यकतेनुसार नियंत्रण क्षेत्र व बफ़र क्षेत्र याची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर यशस्वीपणे करावी.

**वैयक्तिक नागरिकांच्या बाबतीत सनियंत्रण-**

४) कोरोना बाधित व्यक्तींच्या संपर्कात आलेले नागरिक, दि-१५/०२/२०२० नंतर परदेश दौरा केलेले नागरिक व त्यांच्या संपर्कात आलेले नागरिक, त्यांना दि-१४/०३/२०२० रोजी निर्गमित केलेले विलगीकरण कक्षाबाबतचा आदेश बजवावा व पोहोच दप्तरी ठेवावी.

५) वरील मुद्दा क्र.४ मध्ये नागरिक आपल्या क्षेत्रात असल्यास आपले अधिनस्त असलेले अधिकारी / कर्मचारी यांच्या पथकांची नेमणूक करुन प्रत्येक विलगीकरणात ठेवलेले नागरिक हे जिल्हाधिकारी यांनी दि-१४/०३/२०२० रोजी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करत आहेत हे सुनिश्चित करावे.

६) वरील मुद्दा क्र.०४ मध्ये नागरिक आपल्या क्षेत्रात असल्यास त्यांच्या कुटूंबातील एक व्यक्ती सदर नागरिकांच्या देखभालीसाठी प्राधिकृत करावा.

७) वरील मुद्दा क्र.०४ मध्ये नागरिक आपल्या क्षेत्रात असल्यास सदर नागरिकांचे व प्राधिकृत केलेल्या कुटूंबातील व्यक्तींचे तसेच आपले क्षेत्रातील नागरिकांना प्रबोधन व मार्गदर्शन करणेत यावे.



Scanned by CamScanner

८) दि-१४/०३/२०२० चे आदेशाचे पालन संबंधित नागरिकाने न केल्यास सदर आदेशाप्रमाणे त्यांना संस्थात्मक विलगीकरण कक्षात स्थलांतरीत करण्यात यावे. संबंधित नागरिकांचे रजिस्ट्रेशन idsp.mkcl.org. करावे व १०४ वर माहिती देण्यात यावी.

**सर्वसाधारण सुचना**

९) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृती करणेत यावी.

१०) आपल्या कार्यक्षेत्रात कामकाज करणारे सर्व शासकीय व शासनाकडून अनुदान / मानधन घेणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यां आदेशाचे अंमलबजावणी करण्याकरिता आपल्या अधिनस्त कामकाज करतील. संबंधितांना रजा देण्याचे अधिकार आपणास राहतील. कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांनी नेमून दिलेल्या कामकाजात हयगय किंवा कसूर केल्याचे निदर्शनास आलेस त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल याची जाणीव क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना करुन देणेत यावी.

११) आपणही आपल्याला नमूद केलेल्या क्षेत्रात पूर्णवेळ थांबावे व विनापरवानगी नमूद केलेले कायक्षेत्र सोडू नये. आपल्या सर्व सुट्ट्या व रजा रद्द करणेत आलेल्या आहेत. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेकडील आदेश नं जि. आ.व्य/१२४/२०२० दि १५.३.२०२० अन्वये श्री विजय देशमुख, रजा राखीव उपजिल्हाधिकारी, कूळकायदा शाखा यांची जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. जिल्हा समन्वय अधिकारी यांना सहाय्य करणेसाठी सहाय्यक जिल्हा समन्वयक अधिकारी म्हणून खालील नमूद केलेल्या अधिका-यांची त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या क्षेत्राकरिता नेमणूक करणेत येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | हुद्दा | मोबाईल क्रमांक | निर्देशित केलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.संदिप कोहिनकर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद पुणे | ९०११३८९४३९ | म.न.पा./ म.पा./ कॅन्टोन्टमेंट बोर्ड वगळुन उर्वरीत ग्रामीण क्षेत्र |
| २ | श्री.चंद्रकांत खोसे | जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा. पुणे | ९४२३५५३७०७ | सर्व नगरपालिका / नगरपंचायती पुणे जिल्हा |
| ३ | मेजर मिलींद तुंगार | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी | ९४२३०३९५९९ | पुणे, देहू, खडकी कॅन्टोन्टमेंट बोर्ड |
| ४ | श्री.विलास कानडे | सह आयुक्त, मिळकत कर, पुणे म.न.पा. | ९६८९९३११८१ | पुणे महानगरपालिका |
| ५ | श्री.बाळासाहेब खांडेकर | सहा.आयुक्त, पिं-चिंचवड म.न.पा. | ७७९६१६२२४३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका |

उपरोक्त नमूद अधिकारी यांनी जिल्हा समन्वय अधिकारी यांचेशी समन्वय साधून संगनमताने दिलेल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडाव्यात, अन्यथा आपलेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ व इतर कायद्यानुसार कार्यवाही करणेत येऊ शकते याची जाणीव करुन देणेत येत आहे.

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**



Scanned by CamScanner